नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २ Issue - 2 | वार सोमवार दि. १९ मे २०२५ Blow- Monday Date 19 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सोलापुरातील टॉवेल कारखान्यात अग्नीतांडव; आठ जणांचा मृत्यू



## सेंट्रल हॅण्डलूम टॉवेल कारखान्यात संपूर्ण कुटुंब आगीत भस्म

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर-अक्कलकोट महामार्गावर असलेल्या एमआयडीसीत पहाटे एका टॉवेल कारखान्यात लागलेल्या आगीवर तब्बल पंधरा तासानंतर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. आगीत एकूण आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी माहिती दिली की, सकाळपासून आम्ही आटोकाट प्रयत्न केले. मात्र आगीने भयंकर असे रौद्ररूप धारण केले होते. जवळपास एक हजार सेल्सिअस तापमान झाले होते. अशा स्थितीत सगळेच प्रयत्न निष्फळ झाले.

सेंट्रल हॅण्डलूम टॉवेल कारखान्यात संपूर्ण कुटुंब आगीत भस्म झाले आहे. सोलापूरच्या इतिहासात आजपर्यंतची सर्वात भयावह घटना असल्याची माहिती नागरिकांनी दिली. बाबा मिस्त्री पुढे म्हणाले, कारखाना मालक हाजी उस्मान मंसुरी हे आपल्या कुटुंबाला वाचवण्यासाठी मास्टर बेडरूम मधील बाथरूममध्ये जाऊन लपले होते. दीड वर्षाचा नातू युसुफ याला काही होऊ नये, यासाठी त्यांनी मिठीत कवटाळून घेतले होते. मात्र भीषण आगीत उस्मान आहे त्या स्थितीत होरपळून मृत पावले. अनस मंसुरी आणि शिफा मंसुरी यांचा देखील होरपळून मृत्यू झाला आहे.

रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास सेंट्रल हॅण्डलूम टॉवेल इंडस्ट्रीज कारखान्याला आग



लागली होती. सकाळच्या सुमारास कारखान्यातील कामगार महताब सैदुसाब बागवान(वय ५५ वर्ष),सलमान महताब बागवान(३० वर्षे) हिना वसीम शेख(३५ वर्षे) या तीन कामगारांना बेशुद्ध अवस्थेत बाहेर काढले होते. शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी गुदमरून मृत्यू झाल्याची माहिती दिली. पंधरा तासांच्या बचाव कार्यानंतर सायंकाळी कामगार आशाबानो महताब बागवान (वय ५० वर्षे) कारखान्याचे मालक हाजी उस्मान मंसुरी (वय ७७ वर्ष), अनस मंसुरी (वय २५ वर्षे) शिफा मंसुरी (वय २० वर्षे) आणि दीड वर्षीय बाळ युसूफ मंसुरी यांचे शव बाहेर काढण्यात आले.

रविवारची मध्यरात्र ही सोलापूरकरांसाठी काळरात्रच बनून आली, अक्कलकोट एमआयडीसी परिसरातील टॉवेल कारखान्यात आगीचा भडका उडाला आणि एका रात्रीत होत्याचं नव्हतं. कंपनीचे मालक उस्मान मंसूरी म्हणजे दिलदार मनाचे उस्मानभाई. मालक असले तरी कामगारांना जीवापाड जपणारा देवमाणूसच. कंपनीतील कामगारांसाठी उस्मानभाईंनी तिथंच राहायची, सर्वोतोपरी व्यवस्था केली होती. त्यामुळे, नडीअडीला, असण्या-नसण्याला कामगारांना हवं नको ते लगेच मिळत. तर, कामगारांचाही मालकावर जीव जडलेला. उस्मानभाईच्या प्रत्येक आरोळीला ओ देत धावून जाणारे हेच कामगार. मात्र, आज उस्मानभाईंनी आरोळी दिली नव्हती तर मध्यरात्री लागलेल्या आगीची (ऋळीश) धग पाहून कंपनीत खालच्या बाजुस राहणारे कामगार मेहताब उस्मानभाईंच्या मदतीला धावले. मालकाला वाचविण्यासाठी मेहताब यांच्यासह त्यांचं अख्ख कुटुंब धावलं. तर, आपल्या कामगारांना वाचविण्यासाठी मालकांनीही शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, या काळरात्रीत सर्वांनीच आपला जीव सोडला. जीवापाड जपणाऱ्या मालकासाठी कामगार कुटुंबानेही जीव पणाला लावला. त्यामध्ये, चौघांनी आपला जीव गमावला.

उस्मानभाई हे कंपनीतील वरील मजल्यावर राहत होते, तर कामगारांसाठी खाली घरं बांधण्यात आली होती. मध्यरात्री आगीची घटना घडल्याचे लक्षात येताच कामगाराने उस्मानभाईंना वाचविण्यासाठी आगीत उडी घेतली. मात्र, आगीने रौद्र रुप धारण केल्याने या कामगारांना आपल्या मालकापर्यंत पोहोचताच आले नाही. अखेर, मेहताब यांच्यासह त्यांची पत्नी आणि मुलालाचाही अग्नितांडवात जीव गेला. आपल्या मालकाप्रतिची निष्ठा जपण्यासाठी कंपनीत कामगार असेलल्या मेहताब यांच्या कुटुंबीयांनी देखील आपल्या प्राणाची आहुती दिली. महेताब, त्यांची पत्नी आयेशा आणि मुलगी हिना, मुलगा सलमान या चौघांचा करुण अंत झाला.

उस्मानभाईंच्या आठवणी सांगताना अनेकांना कोरानाचा काळ आठवतो. कोरोना काळात कामगारांची कुटुंबीयांप्रमाणे घेतलेली काळजी आठवते. कोविडमुळे कंपन्या बंद असतानाही घरात अन्न-धान्य पुरवणारे ते प्रेमळ हात आठवतात. एक तासभरही काम न करता दिलदार मनाने उस्मानभाईंनी दिलेला महिनाभरचा पगार आठवतो. कोविडमध्ये हवं नको सगळं पाहणारे उस्मानभाई, उपाशीपोटी कोणालाही झोपू न देणारे उस्मानभाई आणि आजारपणात गोळ्या-औषधांच्या खर्चांसह बरं होईपर्यंत आपुलकीने सेवा करणारे उस्मानभाई आज आठवत आहेत. वयोवृद्ध कामगारांना मजुरीपेक्षा जास्त पैसे देणारे उस्मानभाई होते. उस्मानभाईंच्या आठवणी आणि दिलदारपणा सांगताना आज येथील कित्येकांच्या डोळ्यात पाणी आलं होतं. देवाने असं का बरं केलं असेल, अल्लाने ऐसा क्यूँ किया, हमारे मालिक को हमसे छिन लिया... असा आक्रोश कंपनीबाहेर पाहायला मिळाला. म्हणूनच,



आगीच्या घटनेची माहिती मिळताच हिंदू-मुस्लिम समाजातील अनेकांनी उस्मानभाईंच्या घराकडे धाव घेतली. मुस्लिम समाजाच्या विविध संघटनांनी, मौलवींनी, नातलगांनी काळजीपोटी कंपनी गाठली. अग्निशमन जवानांच्या प्रयत्नांना यश येऊ दे, उस्मानभाई सहीसलामत बाहेर येऊ दे अशी प्रार्थना कित्येक हात करत होते. मात्र, सगळ्या प्रार्थनांच्या पुढे आज काळ होता, ज्या काळाने उस्मानभाईंना सगळ्यांपासून हिरावून नेलं.

आगीच्या घटनेची माहिती मिळताच प्रत्येक हात मदतीचा हातभार लावण्यासाठी उस्मानभाईंच्या कंपनीकडे धावले. त्यामध्ये, रुग्णसेवक जहांगीर सय्यद उर्फ लादेन आणि रुग्णसेवक मौलाली सय्यद उर्फ बाबा मिस्त्री यांनी अतोनात प्रयत्न केले. आगीत होरपळून निघालेल्या कामगारांच्या तीन डेडबॉडी बाहेर काढण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. तर, उस्मानभाई जिवंत बाहेर येतील अशी आस बाळगून लादेन आणि बाबा मिस्त्री यांनी संध्याकाळ तिथंच ठाण मांडलं. पण, दुर्दैवाने इतर ५ जणांचे मृतदेहच त्यांना बाहेर काढावे लागले. आपला रुग्णसेवेचा धर्म त्यांनी रात्री उशिरापर्यंत पाळला.

### पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

**सोलापुरातील घटनेवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात सोलापूर इथे आग लागून झालेल्या दुर्घटनेतील जीवितहानीमुळे तीव्र दु:ख झाले. आपले प्रियजन गमावलेल्या कुटुंबांप्रति माझ्या सहवेदना. जखमी झालेले लवकर बरे होवोत ही प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून (झचछठऋ) प्रत्येक मृतांच्या वारसाला २ लाख रुपयांची मदत दिली जाईल. जखमींना ५०,००० रुपये दिले जातील, असे ट्विट मोदींनी केले आहे. तर, सोलापूरमध्ये अक्कलकोट मार्गावर एका टेक्सटाईल युनिटला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दु:खद आहे.मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येईल, असे ट्विट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.**

# खळबळजनक! तिहेरी हत्याकांडाने मुंबई हादरली दोन कुटुंबीयांचा एकमेकांवर हल्ला, 3 ठार ४ जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबानगरीतील दहिसर पश्चिम एम.एच.बी पोलीस ठाण्याच्या (झेश्रळलश) हद्दीतील गणपत पाटील नगर परिसरात दोन कुटुंबात तुफान हाणामारीची घटना घडली आहे. दोन कुटुंबातील या भांडणात चक्क चाकू आणि कोयताने एकमेकांवर जोरदार हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. जुन्या वादातून दोन कुटुंबीयांतील मारहाणाच्या घटनेचं गंभीर गुन्ह्यात रुपांतर झालंय. या घटनेत ३ जण जागीच ठार झाले असून ४ जण गंभीर जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

हमीद शेख (वय ४९ वर्षे), रमणलाल गुप्ता (वय ५० वर्ष) आणि अरविंद गुप्ता (वय २३ वर्ष) अशी मृत्यू झालेल्या तिघांची नावे असून हे सर्व गणपत पाटील नगर मधील रहिवाशी आहेत. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आज दोन्ही बाजूने तुफान राडा झाला होता. याच राड्यामध्ये गणपत पाटील नगर परिसरात असलेला दुकानदारांकडून चाकू आणि कोयता घेऊन दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हल्ला करण्यात आला. त्यामध्ये, तीन जणांचा जीव गेला असून ४ जण गंभीर जखमी आहेत. जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. याप्रकरणी, सध्या एम.एच.बी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एम एच बी पोलीस ठाणे गणपत पाटील नगर या झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या शेख व गुप्ता परिवारांमध्ये २०२२ मध्ये क्रॉस गुन्हे दाखल होते. तेव्हापासून त्यांचे वैमनस्य आहे. आज रोजी ४.३० वाजेच्या सुमारास गणपत पाटील नगर गल्ली नंबर १४ चे रस्त्यावर राम नवल गुप्ता याचा नारळ विक्री स्टॉल समोर अमित शेख हा दारू पिऊन आलेवर त्यांचेत वाद सुरु झाले. दोघांनी आपले मुलांना बोलावले. त्यानंतर, गुप्ता त्याची मुले अमर गुप्ता, अरविंद गुप्ता व अमित गुप्ता यांची आणि हमीद नसिरुद्दीन शेख, त्याची मुले अरमान हमीद शेख व हसन हमीद शेख यांच्यामध्ये हाताने व धारदार शस्त्राने मारामारी झाली. सदर मारहाणीमध्ये राम नवल गुप्ता (वडील) व अरविंद गुप्ता हे मयत झाले असून अमर गुप्ता व अमित गुप्ता जखमीआहेत. तसेच हमीद शेख (वडील) हा सुद्धा मयत झाला असून त्याचा मुलगा अरमान शेख व हसन शेख जखमी आहे. शताब्दी हॉस्पिटल येथून मृतदेह झच् करिता पाठवले आहेत. क्रॉस खुनाचे गुन्हे दाखल करन्याचे काम सुरु असून आरोपी जखमी असल्याने अटक बाकी आहे.

# सरन्यायाधीशांची उघडपणे नाराजी; प्रोटोकॉल पाळायला डीजी, पोलीस आयुक्त, मुख्य सचिव धावत-पळतच आले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्रपुत्र भूषण गवई (इहीहरप ऋर्ळीरळ) यांनी मुंबईत बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्याकडून करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात विविध मुद्यांवर भाष्य केलं. सत्काराच्या भाषणाच्या समारोपावेळी महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचे प्रमुख उपस्थित न राहिल्याचा मुद्दा उपस्थित केला. यानंतर तातडीनं पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेनं भारती मुख्य सचिव सुजाता सौनिक सरन्यायाधीशांच्या भेटीसाठी दादर येथील चैत्यभूमीवर दाखल झाल्या. सरन्यायाधीशांच्या सत्कार सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती दिपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराध्य, केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश नितीन जामदार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी संविधान सर्वोच्च असल्याचं भाष्य केलं.

महाराष्ट्र राज्याचा एक व्यक्ती सरन्यायाधीश म्हणून राज्यात पहिल्यांदा येत असताना, महाराष्ट्राच्या मुख्य (पान २ वर...)

## भारतातील सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या ९३ वर


## सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये रुग्ण वाढले

# केईएम रुग्णालयामध्ये दोन संशयित कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केईएम रुग्णालयामध्ये संशयित कोरोना बाधित असलेल्या दोन रुग्णांचा मृत्यू झाला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. संशयित कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू त्यांना असलेल्या सहव्याधीमुळं झाल्याचं केईएम रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे. तर, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी या दोन रुग्णांचा मृत्यू कोरोनामुळं झाल्याचं म्हटलं आहे. त्यामुळं केईएम रुग्णालयातील या दोन रुग्णांचे रुग्णांचे मृत्यू नेमके कशामुळं झाले याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

मुंबईतील केईएम रुग्णालयातील संशयित कोरोनाबाधित असलेल्या दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. रुग्णालय प्रशासनानं दोन रुग्णांचा मृत्यू कोरोनामुळे झाला नसून त्यांना असलेल्या



सहव्याधीमुळे झाला असल्याचं सांगितलं आहे. विशेष म्हणजे ५८ वर्षीय महिलेचा कर्करोगामुळे आणि १३ वर्षीय मुलीचा मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झाला असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, दोन्ही रुग्णांच्या मृत्यूपूर्वी केलेल्या चाचणीमध्ये हे रुग्ण कोरोना बाधित असल्याचे स्पष्ट झाले होते.तसे असले तरी त्यांचा मृत्यू कोरोनामुळे झाला नसल्याचे केईएम रुग्णालयाच्या प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

केईएम रुग्णालयात ५८ वर्षीय महिलेचा आणि १३ वर्षीय मुलीचा कोरोनाने मृत्यू झाला असल्याचं माजी महापौर किशोरी पेडणेकर यांचं म्हणणं आहे. किशोरी पेडणेकर यांनी केलेला दावा आणि केईएम रुग्णालयाकडून देण्यात येत असलेली माहिती यामध्ये विसंगती दिसून येत आहे. त्यामुळं या रुग्णांच्या मृत्यूचं नेमकं कारण काय असेल याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

भारतातील सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या ९३ इतकी आहे. तर, २८ एप्रिलनंतर वाढलेल्या कोरोना रुग्णांची संख्या ५८ इतकी आहे. ५ मेनंतर बऱ्या झालेल्या कोरोना रुग्णांची संख्या ४२ इतकी आहे. महाराष्ट्रातील एकूण कोरोना रुग्णांची संख्या १२ इतकी आहे. २८ एप्रिलनंतर महाराष्ट्रात कोरोना रुग्णांची संख्या ७ इतकी नोंदवली गेली आहे. तर, ५ मेनंतर करोनामुक्त झालेल्या रुग्णांची संख्या ५ इतकी आहे. सर्वाधिक कोरोना रुग्ण तामिळनाडू, केरळ आणि पुदुचेरी मध्ये आहे.

कोरोनाबाधित रुग्णांची संख्या सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये देखील वाढली आहे. सिंगापूरमध्ये कोरोनाबाधित रुग्णांची संख्या मे महिन्यात पहिल्या आठवड्यात २८ टक्क्यांनी वाढली आहे. तर, रुग्णसंख्या १४२०० वर पोहोचली आहे. हाँगकाँमधील कोरोना रुग्णांचा आकडा समोर आला नसला तरी तिथल्या कोरोना चाचण्यांच्या संख्येत वाढ झाली आहे.

## संपादकीय....

### सरन्यायाधीशांची नाराजी

सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्रपुत्र भूषण गवई यांनी मुंबईत बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्याकडून करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात विविध मुद्यांवर भाष्य केलं. सत्काराच्या भाषणाच्या समारोपावेळी महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचे प्रमुख उपस्थित न राहिल्याचा मुद्दा उपस्थित केला. यानंतर तातडीनं पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेनं भारती मुख्य सचिव सुजाता सौनिक सरन्यायाधीशांच्या भेटीसाठी दादर येथील चैत्यभूमीवर दाखल झाल्या. सरन्यायाधीशांच्या सत्कार सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती दिपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराध्य, केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश नितीन जामदार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी संविधान सर्वोच्च असल्याचं भाष्य केलं. महाराष्ट्र राज्याचा एक व्यक्ती सरन्यायाधीश म्हणून राज्यात पहिल्यांदा येत असताना, महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना, महाराष्ट्राच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि मुंबई पोलीस आयुक्तांना तिथं येण्याची योग्यता वाटत नसेल तर त्याबद्दल त्यांनीच विचार केला पाहिजे. मला प्रोटोकॉलचं बिल्कुल ही काही वाटत नाही. अजूनही अमरावती आणि नागपूरला जात असताना पायलट एस्कॉर्ट घेऊन जात नाही. सुप्रीम कोर्टात येईपर्यंत अमरावतीला मित्रांच्या दुचाकीवरुन फिरायचो. राज्यघटनेच्या संस्थेचा प्रमुख पहिल्यांदा या राज्यात येत असेल आणि तोही त्या राज्याचा असेल तर जी वागणूक त्यांनी दिली याचा विचार करावा.मला लहान सहान गोष्टीमध्ये पडायचं नाही. आमच्यातील दुसरा कोणी असता तर आर्टिकल १४२ चा विचार केला असता. लोकांना कळलं पाहिजे यासाठी उल्लेख केला, असं सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या सत्काराला उत्तर देताना नाराजी व्यक्त केल्यानंतर अधिकाऱ्यांची धावाधाव झाली.

# संरक्षण बजेटमध्ये ५० हजार कोटी रुपयांची वाढ करण्याचा प्रस्ताव

## पाकिस्तानविरुद्ध ऑपरेशन सिंदूरनंतर मोठं पाऊल; आधुनिक शस्त्रे आणि तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केलं जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तानविरुद्धच्या ऑपरेशन सिंदूरनंतर केंद्र सरकार संरक्षण बजेटमध्ये ५० हजार कोटी रुपयांची वाढ करू शकते. संरक्षण मंत्रालयाने सरकारला निधी वाढवण्याचा प्रस्ताव दिला आहे, ज्याला नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मंजुरी मिळू शकते. सरकारी सूत्रांच्या हवाल्याने मीडिया रिपोर्ट्समध्ये ही माहिती देण्यात आली आहे. या निधीतून नवीन शस्त्रे, दारूगोळा आणि तंत्रज्ञान खरेदी केले जाईल असे सांगण्यात आले आहे. यासोबतच सैन्याच्या इतर गरजा, संशोधन आणि विकास यावरही पैसे खर्च केले जातील.



वाढीनंतर, संरक्षण मंत्रालयाचे एकूण बजेट ५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल. १ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सशस्त्र दलांसाठी ६.८१ लाख कोटी रुपयांचे विक्रमी बजेट दिले. या वर्षीचे संरक्षण बजेट गेल्या वर्षीपेक्षा सुमारे ९.५ टक्के जास्त आहे. केंद्राने २०२४-२५ मध्ये सशस्त्र दलांसाठी ६.२२ लाख कोटी रुपये दिले होते. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात २०१४-१५ मध्ये संरक्षण मंत्रालयाला २.२९ लाख कोटी रुपये देण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू आहे. दरम्यान, संरक्षण बजेटमध्ये वाढ करण्याबाबत संरक्षण मंत्रालयाचा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे. पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर (पीओके) वर हल्ला केला. यादरम्यान, भारताने त्याच्या प्रगत हवाई संरक्षण प्रणालीमुळे सीमा ओलांडल्याशिवाय पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. पाकिस्ताननेही प्रत्युत्तर म्हणून हल्ला केला, परंतु भारताच्या बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीने जवळजवळ प्रत्येक पाकिस्तानी क्षेपणास्त्र आणि ड्रोनला निष्क्रिय केले.

भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर दरम्यान रशियन बनावटीची एस-४००, बराक-८ मध्यम श्रेणीची एसएएम प्रणाली आणि स्वदेशी आकाशतीर प्रणाली तैनात केली. याशिवाय, पेकोरा, ओएसए-एके आणि एलएलएडी गन (कमी-स्तरीय हवाई संरक्षण तोफा) द्वारे पाकिस्तानचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले देखील हाणून पाडण्यात आले.

**भारताचा लष्करी खर्च पाकिस्तानपेक्षा ९ पट जास्त**

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट (एसआयपीआरआय) च्या अहवालानुसार, जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश असलेल्या भारताचा लष्करी खर्च २०२४ मध्ये १.६ टक्के वाढून ७.१९ लाख कोटी झाला आहे. त्याच वेळी, पहलगाम हल्ल्यापासून अणु क्षेपणास्त्रे डागण्याची धमकी देणाऱ्या पाकिस्तानचा लष्करी खर्च सुमारे ८५ हजार १७० कोटी होता. २८ मे रोजी प्रसिद्ध झालेल्या 'ट्रेंड्स इन वर्ल्ड मिलिटरी एक्सपेंडिचर २०२४' अहवालानुसार, भारत पाकिस्तानपेक्षा आपल्या सैन्यावर ९ पट जास्त पैसे खर्च करत आहे. लष्करावर खर्च करणारे जगातील टॉप ५ देश अमेरिका, चीन, रशिया, जर्मनी आणि भारत आहेत. या पाचही जणांचा एकूण लष्करी खर्च १६२५ अब्ज डॉलर्स म्हणजेच ₹ १३६.५२ लाख कोटी आहे.

# शासकीय वसतिगृहासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरु असून, सोलापूर जिल्ह्यातील शासकीय वस्तीगृहांमध्ये निशुल्क प्रवेशाची अंतिम तारीख - अभ्यासक्रमाचा अंतिम वर्षाचा निकाल लागल्यापासुन पुढील १५ दिवस, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहे ही योजना राबविली जाते. सदर योजनेंतर्गत जिल्ह्यात एकुण १६ शासकीय वसतिगृहे असून त्यामध्ये मुलांसाठी ९ व मुलीसाठी ७ शासकीय वसतिगृहांचा समावेश आहे.

अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग समाजाच्या तसेच दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुसज्ज वातावरणात उत्तम शिक्षण देऊन त्यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील करणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

प्रवेश कोणासाठी आहे- इयत्ता ८वी पासून ते उच्च/व्यावसायिक शिक्षणाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घेऊ इच्छणारे विद्यार्थी.

प्रवेशित विद्यार्थ्यांना निशुल्क पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा- शैक्षणिक इयत्तेनुसार क्रमिक पाठ्यपुस्तके व आवश्यक स्टेशनरी, स्पर्धा परीक्षा (उएढ, छएएढ, चझडउ, णझडउ, इत्यादी) तयारीसाठी संदर्भ पुस्तके, वातानुकूलित संगणक कक्ष, ई-लायब्ररी, अभ्यासिका, व अंतर्गत जिम, भोजन व शुद्ध पिण्याचे पाणी, उउढत कॅमे-यांसह २४ तास सुरक्षा तसेच २४ तास सुरक्षारक्षकांची उपस्थिती, प्रशस्त स्वच्छ निवासगृहे, क्रीडा साहित्य, व मैत्रीपूर्ण अल्हाददायक शैक्षणिक वातावरण.

निर्वाहभत्ताः तालुका स्तरावर ५०० रुपये/महिना आणि जिल्हा स्तरावर ६०० रुपये (मुलींसाठी रु. १००/-ज्यादा)

जिल्ह्यातील वसतिगृहाचे ठिकाणे- मुलांसाठी (९ वसतिगृह): सोलापूर व बार्शी प्रत्येकी २ वसतिगृह, अक्कलकोट, पंढरपूर, माढा, अकलूज, करमाळा प्रत्येकी १ वसतिगृह. मुलींसाठी (७ वसतिगृह): सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, बार्शी, कुडूवाडी, माळशिरस.

अर्ज करण्याची प्रक्रियाः अभ्यासक्रमाचा अंतिम वर्षाचा निकाल लागल्यापासून पुढील १५ दिवस

संपर्कः http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येतील. अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहाचे गृहपाल किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, सोलापूर (दुरध्वनी क्र. ०२१७-२७३४९५०) या क्रमांकावर संपर्क साधावा.

एक जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्यः एखाद्या विद्यार्थ्यांचे जीवन बदलण्यासाठी फक्त एक संदेश पुरेसा आहे! ही माहिती आपल्या परिसरातील गरजवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक, व सामाजिक कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवा. विद्यार्थ्यांना या सुवर्णसंधीचा लाभ मिळवून देण्यात आपणही सहभागी व्हा!असे सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी कळविले आहे.

# सरन्यायाधीशांची उघडपणे नाराजी; प्रोटोकॉल पाळायला डीजी, पोलीस आयुक्त, मुख्य सचिव धावत-पळतच आले

(पान १ वरून..) सचिवांना, महाराष्ट्राच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि मुंबई पोलीस आयुक्तांना तिथं येण्याची योग्यता वाटत नसेल तर त्याबद्दल त्यांनीच विचार केला पाहिजे. मला प्रोटोकॉलचं बिल्कुल ही काही वाटत नाही. अजूनही अमरावती आणि नागपूरला जात असताना पायलट एस्कॉर्ट घेऊन जात नाही. सुप्रीम कोर्टात येईपर्यंत अमरावतीला मित्रांच्या दुचाकीवरुन फिरायचो. राज्यघटनेच्या संस्थेचा प्रमुख पहिल्यांदा या राज्यात येत असेल आणि तोही त्या राज्याचा असेल तर जी वागणूक त्यांनी दिली याचा विचार करावा.मला लहान सहान गोष्टीमध्ये पडायचं नाही. आमच्यातील दुसरा कोणी असता तर आर्टिकल १४२ चा विचार केला असता. लोकांना कळलं पाहिजे यासाठी उल्लेख केला, असं सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले.

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या सत्काराला उत्तर देताना नाराजी व्यक्त केल्यानंतर अधिकाऱ्यांची धावाधाव झाली. सत्काराचा कार्यक्रम झाल्यानंतर सरन्यायाधीश दादरच्या चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाधीचं दर्शन घेण्यासाठी दाखल झाले. त्यापूर्वी डीजी रश्मी शुक्ला सोबत मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती सुद्धा चैत्यभूमी मध्ये दाखल होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी चैत्यभूमी मध्ये दर्शन घेण्यापूर्वी डीजी रश्मी शुक्ला सोबत मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आणि सुजाता सैनिक सोबत चर्चा केली.त्या चर्चेवेळी भूषण गवई यांनी नाराजी व्यक्ती केली. यानंतर तिन्ही अधिकाऱ्यांकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, चैत्यभूमीवरुन अभिवादन करुन बाहेर पडताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी जे झालं ते मी कळवल आहे. प्रोटोकॉल बाबत माझी कोणतीही नाराजी नाही असं म्हटलं.

## २०२६ अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसाचे १२ तास मिळेल स्वच्छ वीज : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा

# शेती व शेतकऱ्यांच्या भाग्योदयासाठी एक राष्ट्र-एक कृषी व एक टीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : आमचे शेतकरी हे मेहनती आहेत. निसर्गाच्या प्रत्येक आव्हानाला ते धैर्याने तोंड देतात. आपल्या शेतातील उत्पादनासाठी घाम गाळतात. त्यांच्या घामाला, कष्टाला न्याय देण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्रासाठी काम करणारे सर्व संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार व सर्व संस्था एकत्र येऊन मिशन मोडवर काम करण्याची गरज आहे. व्यवस्थेतील ही त्रुटी दूर करण्यासाठी एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम म्हणून कृषी विभाग आता काम करेल, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विकसित कृषी संकल्प अभियानअंतर्गत किसान संमेलनात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास कृषी मंत्री ड . माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री ड . आशिष जयस्वाल, खासदार श्याम बर्वे, आमदार आशिष देशमुख, आमदार चरणसिंग ठाकूर, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कुलगुरु नितीन पाटील, कृषी आयुक्त सुरज मांडरे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे डॉ.एम.एल.जाट, डॉ.एस.के.सिंग, डॉ.अमरेश कुमार नायर, डॉ.डी.के. यादव, डॉ. राजवीर सिंह व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शेती व शेतकऱ्यांसाठी भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेअंतर्गत देशात १६ हजार वैज्ञानिक आहेत. त्यांचे विविध पिकांवर सतत संशोधन सुरु असते. याचबरोबर परिषदेअंतर्गत ११३ संशोधन केंद्र आहेत. यातील ११ केंद्र महाराष्ट्रात आहेत. याचा जोडीला जिल्हा कृषी केंद्र, प्रगतशील शेतकरी, राज्य सरकारचे कृषी कार्यालये आहेत. या सर्व यंत्रणेमध्ये एकसुत्रतेचा अभाव लक्षात घेऊन एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम या संकल्पनेची नितांत गरज होती असे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले.

कृषी हा भारतीय व्यवस्थेचा कणा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण गौरवशाली भारत, समृद्ध भारत पाठोपाठ शक्तीशाली भारत निर्माण केला आहे. भारत आता वैभवशाली राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. याला अधिक भक्कम जर करायचे असेल तर विकसित शेती व विकसित शेतकरी हे तत्व आपण जपले पाहिजे. विकसित खेती व समृद्ध किसान पाठोपाठ विकसित व गरिबीमुक्त गाव हे शासनाचे लक्ष




असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलयुक्त शिवार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा कृषीमंत्र्यांनी केला गौरव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात जलसंधारणाची जी कामे केली त्याला तोड नाही. जलयुक्त शिवार महाराष्ट्राला वरदान ठरले. संयम, धैर्य व निश्चयी वृत्तीने त्यांची कार्यशैली कोणत्याही आव्हानात डगमगली नाही या शब्दात केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने येथे उपस्थित असलेले भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेचे सर्व संशोधक व वरिष्ठ अधिकारी महाराष्ट्राच्या कृषी विकासाचा रोडमॅप तयार करतील असे त्यांनी सांगितले.

देशात कृषी संशोधन करणाऱ्या लॅबची कमतरता नाही. संशोधकाची कमतरता नाही. शासकीय कृषी विभागाचीही कमतरता नाही. कमतरता आहे लॅबला अर्थात संशोधनाला शेताच्या बांधावर पोहोचविण्याची. ही कमतरता भरुन काढण्यासाठी वर्षातील एक महिना कृषी संशोधक, अधिकारी हे शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांसोबत काम करतील असे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी स्पष्ट केले. शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी नविन तंत्रज्ञानाला जवळ करण्याशिवाय पर्याय नाही. याच बरोबर विविध खतांसाठी कंपन्यांना शासन जी सबसिडी देते ती सबसिडी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात देण्याचा आम्ही निर्णय घेत असल्याचे सुतोवाच त्यांनी केले.

**२०२६ अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसाचे १२ तास मिळेल स्वच्छ वीज- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यात शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विजेच्या प्रश्नाला मार्गी लावण्यासाठी आम्ही धोरणात्मक निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दिवसाही विजेचा पुरवठा व्हावा यासाठी केंद्र सरकारच्या कुसुम योजनेला आम्ही मुख्यमंत्री सौर कृषी योजनेची जोड दिली आहे. यातून १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीचे काम आम्ही सुरु केले असून आजच्या घडीला यातील ४ हजार मॅगावॅटची निर्मिती पूर्णत्वास आली असल्याचे ते म्हणाले. २०२६ च्या अखेरपर्यंत आम्ही दिवसाचे १२ तासही वीज देण्यासह राज्यात १२ महिने विजेची उपलब्धता करु असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीप्रश्न मार्गी लागावा, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सावरता यावे यादृष्टीने देशातील सर्वात मोठा नदीजोड प्रकल्प म्हणून ज्याकडे पाहिले जात आहे त्या नळगंगा-वैनगंगा या प्रकल्पाचे काम यावर्षी सुरु करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. याचबरोबर तापी मेगा रिचार्ज हा जगातील आश्चर्य असणाऱ्या प्रकल्पाचे काम आपण हाती घेतले आहे. समुद्राला वाहून जाणारे सुमारे ३५ टिएमसी पाणी या प्रकल्पातून आपण आणणार आहोत. बुलडाणा, अकोला, अमरावती या जिल्ह्यातील खारपान पट्टा क्षेत्राला याचा लाभ होणार आहे. येथील लाखो शेतकऱ्यांचे जिवनमान या प्रकल्पातून उंचावले जाईल असे ते म्हणाले.

राज्यातील कृषी क्षेत्राला सावरण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवन योजना आपण जागतिक बँकेशी चर्चा करुन सुरु केली. सुरुवातीला आपण ५ हजार गावे यासाठी निवडले. या गावानी साध्य केलेला बदल पाहून जागतिक बँक पुन्हा सहकार्यासाठी तयार झाली. आता त्यांच्या सहयोगातून राज्यातील सुमारे ७ हजार ५०० गावात एकात्मिक पद्धतीने काम करुन कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतीसाठी शेतमजूरांचा प्रश्न सर्वत्रच भडसावत आहे. यावर मार्ग काढण्यासाठी यांत्रिकीकरणाचा पर्याय अधिक भक्कम करुन तो शेतकऱ्यांपर्यंत आपल्याला पोहोचवावा लागेल, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. शेतकऱ्यांना यांत्रिकीकरण परवडण्याच्यादृष्टीने केंद्र सरकार विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

ग्राम विकास आणि कृषी विकास याचे आदर्श मॉडेल केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मध्यप्रदेशमध्ये विकसित करुन दाखविले आहे. शेतीपुढे अनेक आव्हाने आहेत. मातीपासून प्रदूषित पाण्यापर्यंतची आव्हाने असून संशोधक यातून मार्ग देत आहेत. महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग शेतकऱ्यांना सावरण्यासाठी कटीबद्ध असल्याचे राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

या कार्यक्रमात राष्ट्रीय मृद स्पेक्ट्रल व कापसावरील गुलाबी बोंड अळीला प्राथमिक अवस्थेत नियंत्रणासाठी उपयोगी पडणाऱ्या एआय फेरोमन ट्रॅकचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दहा लाखासाठी पत्नीला मारहाण करून दिला शारीरिक व मानसिक त्रास; पतीसह तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) पती,सासू व नणंद यांनी संगणमत करून फिर्यादी मधुमती प्रसेनजित घोलप (वय-२९,रा. भारतरत्न इंदिरा नगर) यांना माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये म्हणत व तसेच तुला मुलगी कशी झाली या कारणावरून शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण केल्याची फिर्याद




मधुमती घोलप यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. ही घटना १० ऑगस्ट २०१७ ते २२ एप्रिल २०२५ रोजी दरम्यान भारतरत्न इंदिरानगर गेंट्याल टॉकीज जवळ घडली.याप्रकरणी मधुमती घोलप यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून पती प्रसेनजित, सासू उमा ,नणंद मृणाली (सर्व राहणार भादोले तालुका हातकणंगले,जि. कोल्हापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनाम दार हे करीत आहेत.

### अनोळखी महिलेने तीन वर्षाच्या बालिकेला पळवले

सोलापूर, (प्रतिनिधी) : राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक आवारातून अज्ञातानं ०३ वर्षीय बालिकेला पळवून नेल्याची घटना बस स्थानक परिसरात शुक्रवारी, १६ मे रोजी सकाळी ११.४० वा.च्या सुमारास घडलीय. ईश्वरी लक्ष्मण शिंदे असं बालिकेकं नाव आहे.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील रहिवासी लक्ष्मण साहेबराव शिंदे हल्ली शिवशक्ती हॉटेलच्या पाठीमागे, विजयकुमार दिघे यांचे घरात भाड्याने वास्तव्यास आहेत. ते त्यांची पत्नी व मुलगी ईश्वरी यांना एस. टी. ने बार्शी येथे पाठविण्यासाठी बस स्थानक परिसरात आले होते.

शिंदे बार्शीला जाणाऱ्या विना थांबा एस. टी. चे तिकीट काढण्याकरिता रांगेत थांबले असता, सुट्टे पैसे मागण्याकरीता पत्नीस तिकीट खिडकीजवळ बोलावून घेतले.त्यांच्या पत्नीने मुलगी ईश्वरी ला ती जिथे थांबली होती, तिथंच सोडून सुट्टे पैसे देण्याकरीता आली.

ती थांबलेल्या ठिकाणी परत गेली असता, मुलगी ईश्वरी ही तिथं दिसून आली नाही.बालिका ईश्वरी त्या ठिकाणावरून हरविल्याच्या माहितीनं धास्तावलेल्या शिंदे दाम्पत्यांनं सीसीटिव्ही फुटेज पाहिले.त्यात कोणीतरी एक अनोळखी महिला ईश्वरी हिस घेऊन जात असल्याचे दिसून आले.

त्या अनोळखी महिलेनं ईश्वरीला पळवून नेत असल्याचे दिसून आल्यावर लक्ष्मण साहेबराव शिंदे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार ईश्वरी हिला पळवून नेल्याप्रकरणी त्या महिलेविरुध्द भा. न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे शुक्रवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आलाय. सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# वृत्तपत्र विक्री व्यवसाय बंद ठेवून कडकडीत बंद पाळला

## विक्रेत्यांची मागण्याची दखल घ्यावी : सोलापूर जिल्हा वृत्तपत्र उपाध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वृत्तपत्र विक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी दिनांक १८ मे रोजी एक दिवशी जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी आपला वृत्तपत्र विक्री व्यवसाय बंद ठेवून कडकडीत बंद पाळला आहे आता तरी प्रशासनाने खडबडून जागे होऊन विक्रेत्यांची मागण्याची दखल घ्यावी अशी अपेक्षा सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेते उपाध्यक्ष व सर्व व्यक्त केल.

अनेक दिवस वृत्तपत्र विक्रेते कमिशनमध्ये वाढ व्हावी याच्याकरिता वारंवार वृत्तपत्र प्रशासनाला पत्र व्यवहार करून १५ मे रोजी आम्ही आपला सकारात्मक निर्णय घेऊ सोलापूर मध्ये मीटिंगमध्ये सांगण्यात आले परंतु त्यांची कारवाई ५ मे मध्ये पर्यंत कारवाई न झाल्याने सोलापूर जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी १८ मे रोजी संपूर्ण जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्री बंद ठेवून आपला आवाज प्रशासनापर्यंत जावा सर्वांनी जागृत राहून पूर्ण जिल्ह्यात उत्तरपत्र विक्री झाली नाही.

गेले अनेक दिवसापासून वृत्तपत्र विक्री संघटना आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कमिशनमध्ये वाढ व्हावी पुरवणी टाकण्यामध्ये संघटने मार्फत ही पत्रव्यवहार करून करून देखील विक्रेत्यांच्या निवेदनाची दखल घेतल्याने १८ मे रोजी चा बंद पुकारला आहे भल्या पहाटेपासून वृत्तपत्र विक्रेते सावरगाव पुतळ्यासमोर फुटपाथ वर बंद बाबत घोषणा देत होते यानंतर सर्व विक्रेते गोपाळकृष्ण मंदिरा जवळ सार्वजनिक वार्ता फलका शेजारी आजचा बंद कशासाठी आहे या घोषणा देत परिसर दणाणून गेला.

आज संपूर्ण जिल्ह्यात वृत्तपत्र विक्रेत्यांनी कडकडीत बंद पाडून वृत्तपत्र व्यवसायातील पंचायत समिती लक्ष वेदले याचवेळी पंढरपूर शहर जिल्हा व तालुक्यातील वाचकांची एक दिवसीय गैरसोय झाल्याबद्दल समस्व दिलगिरी व्यक्त करून घोषणा दिल्या व काही वाचकांची पंढरपुरात भेटून वृत्तपत्र पाठिंबा दर्शवला जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेता एक छोटासा पण प्राथमिक विषय आहे.






# माणूस केंद्र बिंदू मानून बाबासाहेबांनी राष्ट्र उभारणी केली : प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी : डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक चळवळी केल्या,आंदोलने केली, लढे उभारले, लेखन केले, वक्तव्य केली त्यावेळी त्यांच्यासमोर राष्ट्राचे सार्वभौमत्व होते. भारताच्या ऐक्याला तडा जाईल असा एकही निर्णय किंवा कार्य त्यांच्यातून झाले नाही. या सर्वांमध्ये माणूस हा केंद्रबिंदू होता. माणसाला केंद्रबिंदू मानून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्र उभारणी केली असे विचार प्रा.डॉ प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले.

प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट ने आयोजित केलेल्या महात्मा बुद्ध, महात्मा बसवेश्वर, छत्रपती संभाजी महाराज,महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर बोलत होते. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे हे होते.

१९१८ साली बाबासाहेब आंबेडकर शेतीच्या समस्या आणि त्यावरील उपाय सांगतात. कोकणातील चिपळूण येथील परिषदेमध्ये बाबासाहेब म्हणतात की मला शेतकऱ्यांतील पंतप्रधान झालेला पाहायचा आहे. पण देशाच्या आजपर्यंतच्या इतिहासात शेतकऱ्यांचा मुलगा पंतप्रधान झाल्याचे दिसून येत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांचा पहिला संप कोकणामध्ये बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली अलिबाग जवळील चरी या ठिकाणी झाला होता. तसेच बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा किती सखोल अभ्यास केला होता याचा आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला. १९४२ ला बाबासाहेब मजूर मंत्री झाल्यानंतर त्यांच्याकडे अनेक खाती आलेली होती. त्या प्रत्येक खात्यामध्ये उल्लेखनीय काम बाबासाहेबांनी केल्याचे त्यांनी नमूद केले. नॅशनल हायवे ची संकल्पना बाबासाहेबांचीच. देशाच्या पाणी धोरणाचा प्रणेता हे डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत त्यानी भाक्रा नांगल धरण, दामोदर खोरे विकास एवढेच नव्हे तर भारताच्या संपूर्ण नदी प्रणालीचे नियोजन करून ठेवलेले आहे. छोट्या कुटुंबाचा आग्रह त्यांनी धरला दोन पेक्षा अधिक मुलं नको.१९५२ साली त्याने जात निहाय जनगणनेची मागणी केली. आदिवासी, ओबीसी,अस्पृश्य, स्त्रिया,भंगी यांच्यासाठी बाबासाहेबांनी उल्लेखनीय कार्य केल्याचे त्यांनी नमूद केले. देशाची प्रगती स्त्रियांच्या प्रगतीवर मोजली जावी असा आग्रह त्यांनी धरला. देशाच्या स्वातंत्र्य बरोबरच स्त्रियांना मतदनाचा अधिकार देणारा हा जगातला एकमेव असा नेता आहे. या सर्व कार्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने भारत भाग्यविधाता आहेत असे त्यांनी नमूद केले.

प्रा.अशोक वाघमारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विष्णू कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.जे.पी. गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले तर भीमराव कदम सरांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी प्रा.कॉ. तानाजी ठोंबरे,पा.न. निपाणीकर,प्रा.ए. बी.विद्यागर, प्राचार्य डॉ गोरे,प्रा. हेमंत शिंदे, प्राचार्य डॉ लोखंडे तसेच मातोश्री रामाई महिला मंडळाच्या सर्व सदस्या,ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण मोठ्या प्रमाणात हजर होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे प्रा डॉ शशिकांत गायकवाड, प्रा डी डी मस्के, सुनील कांबळे, विक्रम सुरवसे तसेच महादेव बोकेफोडे यांनी नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली, नागनाथ सोनवणे व सम विचारी फ्रंटच्या अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# श्री जानुबाई देवी सा. दिव्यगर्जना या विशेषांकाचे अमर पाटील यांच्या शुभहस्ते प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर तालुक्यातील भोसरी या गावातील श्री जानुबाई देवी यात्रेनिमित्त सा दिवेगर्जना विशेष अंक चे प्रकाशन श्री अमर पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले व त्या अंकांमध्ये गावातील भौगोलिक इतिहास व तसेच जानुबाई देवी विषयी सविस्तर माहिती व अंकांमध्ये थोडक्यात मांडण्यात आलेली आहे त्यामध्ये गावातील आर्थिक करा समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांचा राजवाडा म्हणल्या तरी काय वावगे ठरणार नाही




पंढरपूर तालुक्यातील राजकीय राजधानी म्हणून ह्या पद्धतीने बोसे गावाकडे पाहिले आहे त्याच पद्धतीने तालुक्यातील ऊस पट्ट्याची केंद्र म्हणूनही भोसे गावाची ओळख आहे उजनीच्या डाव्या व उजव्या कालव्याच्या लगत बसलेल्या गावच्या उजनीच्या कालव्यामुळे बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे परिणामी पूर्ण गाव बागायत झाले असून त्यामुळे गावचा आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आणि गावच्या झपाट्याने कायापालट झाला गाव आणि आजूबाजूच्या परिसरातील उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परंतु दशकपूर्वी वाढते उसाचे क्षेत्र आणि अपुऱ्या कारखान्यामुळे ऊस गाळपास जाण्यासाठी भोसे यांच्या आजूबाजूला असलेल्या गावातील शेतकरींची मोठी अडचण होत होती या परिणामी त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन घटून आर्थिक फटका सहन करावा लागत होता ही बाब माजी जिल्हा परिषद अध्यक्ष स्वर्गीय यशवंत भाऊ पाटील यांच्या लक्षात आल्याने या परिसरातील कारखाना उभा करण्याची स्वप्न जिल्हा परिषदेचे माजी सभापती स्वर्गीय राजू बापू पाटील यांनी पूर्ण केले आहे त्यामुळे गावचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे

त्याचबरोबर कोकणची आई जानुबाई देवी भोसरी या पंचक्रोशीच्या भावी भक्तांचे ग्रामदैवत जानुबाई देवी मागील अनेक वर्षांपूर्वी येथील परीट बंधूंच्या बैलाच्या टाचेला आली असल्याची आख्यायिका आहे त्यामुळे येथील परीट समाजाकडे देवीच्या पुजाऱ्याचा मान आहे व तो देवीची स्थापना गोपाळराव पाटील यांनी गावांमध्ये केली व हिंदू मुस्लिम ऐक्याची प्रतीक समजल्या जाणाऱ्या जानुबाई देवीच्या यात्रे दिवशी जानुबाई देवीचा आणि गायकवाड साहेब यांचा एकत्र छबिना काढून सर्वधर्मसमभाव जागेवर जातो

याशिवाय श्री संत देव मामलेदार यशवंतराव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या भोसरीतील ग्रामदैवत जानुबाई देवी भक्तांच्या नवसाला पावणारी देवी म्हणून येथे अख्यायिका आहे व या देवीच्या यात्रेला लाखोंच्या भाविक येत असतात एकूणच गावचा सर्वांगीण विकासासाठी प्रामुख्याने गावचा विकास प्रामुख्याने गावचा विकसित होत असून

गावातील भौगोलिक माहिती व गावचा विकास अशा पद्धतीने झाला याची थोडक्यात माहिती प्रसारित करण्यात आलेली आहे यावेळी उपस्थित व श्री जानुबाई देवीचा विशेष अंक काढण्यासाठी गावातील प्रमुख मंडळींचे मोलाची सहकार्य लाभलेले आह श्री हनुमंत मोरे, श्री राजकुमार टरले, श्री संजय भाऊ तळेकर, श्री मारुती भाऊ कोरके श्री नामदेव कोरके, श्री दत्तात्रय खपाले श्री हरिचंद्र तळेकर, श्री देविदास उर्फ बबन देवकर, श्री संतोष उद्धव तळेकर, डॉक्टर महेश काकडे, श्री शेखर मोरे, श्री अविनाश साळुंखे ज्येष्ठ पत्रकार या सर्वांचे मोलाची सहकार्य लाभले आहे

# ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी महिलेविरोधात तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) स्वतःची आओळख लपवून व्हाट्सअप मोबाईल क्रमांक तसेच फेसबुक प्रोफाईल लिंक यांचा वापर करून व वापरकर्त्याचे लिंक डाऊनलोड करून ऑनलाईन बँकिंग फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी महिले विरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी दिनेश प्रकाश अहुजा (रा. गुरुनानक नगर,सोलापूर) हे घरी असताना संशयित आरोपी अनोळखी महिला नावे आरोही आडवाणी हिने ओळख लपवून फिर्यादीचे व्हाट्सअप,मोबाईल क्रमांक,फेसबुक प्रोफाईलद्वारे ओळख वाढवून शेअर मार्केटद्वारे आर्थिक फायदा असल्याचे भासवुन रक्कम गुंतवण्यास भाग पाडले.सुरुवातीला काही प्रमाणात नफा देऊन विश्वास संपादन करून ७२ लाख ६४ हजार रुपये एवढे खात्यात वर्ग करून घेतले.फिर्यादीने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता संशयित आरोपीने रक्कम देण्याचे टाळले.आपली ऑनलाइन फसवणूक झाली असल्याचे तसेच आपला डेटा चोरी, व्हाट्सअप हँकिंग ,बँकिंग फसवणूक झाल्याप्रकरणी सायबर सेलकडे तक्रार दिली आहेत.पुढील तपास पोलीस करत आहे.

## कुटुंबीयांचे तहसील कार्यालय समोर अमरण उपोषण

# अभिषेक कदम प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथील अभिषेक कदम यांचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळून आला आहे प्रकरणी संशयित म्हणून चार जणांची नावे देण्यात आले आहेत यातील मुख्य आरोपी संदीप मांडवे हा दोन महिन्यापासून फरार आहे पोलिसांनी त्यास अटक करावी अशी या मागणीसाठी कदम व कुटुंबीयांनी शुक्रवारपासून तहसील कार्यालय समोर अमरण उपोषण सुरू केले आहे.




अभिषेक कदम यांचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळून आला याप्रकरणी कुटुंबीयांनी संशय व्यक्त करून चार जनावर गुन्हा दाखल केला आहे या प्रकरणातील मुख्य आरोपी संदीप मांडवे हा राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष शरद पवार गटाचा तू गेली दोन महिन्यापासून पोलिसांना सापडत नाही पोलिसांवर राजकीय दबाव येत असल्याचे दिसून येत आह यामुळे कदम कुटुंबियांनी तहसील कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

या उपोषणामध्ये अशोक कदम सुनीता कदम श्रीनिवास कदम या त्यांच्या कुटुंबांनी सहभाग घेतला आहे जोपर्यंत आरोपी मांडवे यासाठी होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याची खतम कुटुंबियांनी सांगितले आहे.

# एपीआय अजय लोहेकर यांच्या मुलाचा द्वितीय वाढदिवस उत्साहात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोहा शहरामध्ये आज रोजी दिनांक१७/५/२०२५ रोजी शनिवार सकाळी ११ वाजता लोह्यातील शासकीय उपजिल्हा रुग्णालय लोहा येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आले चि.अद्विक अजय लोहेकर यांच्या वाढदिवसानिमित्त ए पि आय अजय लहेकर सौ. अमिता अजय लोहेकर तसेच उपस्थित असलेले डॉक्टर चव्हाण साहेब व लोह्यातील समाज बांधवांची उपस्थिती होती.

चि.अद्विक अजय लोहेकर यांचा वाढदिवस जिजाई मंगल कार्यालय येथे सायंकाळी साडेपाच वाजता ए पी आय अजय लोहेकर यांच्या मुलाचा वाढदिवस लोह्यातील जिजाई मंगल कार्यालय लोहा येथे आयोजित करण्यात आला वाढदिवस साच्या शुभेच्छा देण्याकरता ए पी आय अजय लोहेकर यांच्या कुटुंबासह समाज बांधव व महिलांची उपस्थिती होत्या. चिमुकले बालक तरुण-तरुणी व गावातील अधिकारी पदाधिकारी जेष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते नेतेमंडळी यासह पोलिस अधिकारी व लोह्यातील शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या पत्रकारांचा ही शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

# शेतकऱ्यांना वाजवी दराने व वेळेत खते-बियाणे उपलब्ध झाले पाहिजेत : पालकमंत्री जयकुमार गोरे

## खते व बियाणे सोबत लिंकिंग करून अन्य उत्पादने शेतकऱ्यांना विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत

■ खरीप हंगामाच्या ५ लाख ६ हजार ९२७ हेक्टर क्षेत्रासाठी १ लाख ९४ हजार ३७० मेट्रिक टन बियाण्याची आवश्यकता

■ खरीप २०२५ अंतर्गत खतांची मागणी २ लाख ८६ हजार ५० मेट्रिक टन तर दोन लाख बत्तीस हजार ३५६ मेट्रिक टन खताचे अवांटन मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सोलापूर/जिमाका : जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना योग्य दराने व वेळेत खते बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने दक्ष राहावे. तसेच खते बियाणे विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता खते बियाणे उपलब्ध करून दिली पाहिजेत. लिंकिंग करणाऱ्या संबंधित विक्रेत्यावर प्रशासनाकडून तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश ग्रामविकास, पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित टंचाई आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, राजू खरे, अभिजीत पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, उत्तम जानकर(ऑनलाईन), निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे राज्य संचालक विनायक दीक्षित, जिल्हा फर्टिलायझेशन असोसिएशनचे अध्यक्ष बालाजी चौगुले यांच्या सह सर्व उपविभागीय कषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की खरीप हंगात २०२५ च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व कृषी विभाग यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवश्यक तेवढा खते व बियाण्याचा पुरवठा होईल यासाठी काटेकोर नियोजन करावे. खताची लिंकिंग होणार नाही यावर जिल्हाधिकारी यांनी लक्ष ठेवावे व जो कोणी लिंकिंग करेल त्या संबंधितावर गुन्हे दाखल करावेत. लोकप्रतिनिधी यांनीही त्यांच्याकडे लिंकिंगबाबत तक्रार आल्यास तात्काळ जिल्हाधिकारी यांना कळवावे. लिंकिंग करून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीची गय केली जाणार नाही असेही त्यांनी निर्देशित केले.

कृषी विभागाने बोगस बियाणे व खते शेतकऱ्यांना पुरवठा होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी त्यासाठी आवश्यक बियाणं व खतांचे परीक्षण करावे. सॅम्पल तपासणीची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवावी. अशा बोगस खाते व बियाण्यामुळे या पुढील काळात शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची खात्री करावी. खते विक्रेत्यांना शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल परंतु त्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही या अनुषंगाने निविष्ठांची विक्री करावी असेही निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

खरीप हंगाम २०२४ अंतर्गत नुकसान भरपाई विम्याची ८१ कोटीची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने पुढील पंधरा दिवसात उपलब्ध करून द्यावी. कंपनीचे शासनाकडून १४२ कोटीची रक्कम शासन स्तरावरून अदा होईलच परंतु विमा कंपनीने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची विमा नुकसान भरपाई रक्कम अदा केली पाहिजे असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. तसेच इन्शुरन्स कंपनीकडे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई नाकारली गेली आहे त्याचे प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला पुढील आठ दिवसात उपलब्ध करून द्यावेत असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी खते व बियाणे आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच लिंकिंग होणार नाही यासाठी सर्व संबंधित विक्रेते व कंपनीची बैठक झालेली असून त्यांना याबाबत कठोर निर्देश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे खरीप हंगाम २०२४ मधील सोलापूर जिल्ह्याचे ८१ कोटीची विमा भरपाई रक्कम बाकी असून त्यातील ४८ कोटी हे बार्शी तालुक्याची रक्कम असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे मिळणार नाहीत यासाठी कृषी विभागाच्या वतीने सॅम्पल ची संख्या वाढवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते कृषी विभागाअंतर्गत जिल्ह्यातील ेतकऱ्यांनी विविध पिकांतर्गत हेक्टरी चांगले उत्पादन घेतल्याबद्दल शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पालकमंत्री महोदय व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कृषी विभागाने तयार केलेल्या क्यू आर कोड चे अनावरण यावेळी करण्यात आले. यामध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आलेली असून या क्यूआर कोड च्या माध्यमातून जी आवश्यक योजना आहे त्या योजनेचा किंवा कोड स्कॅन केल्यानंतर त्या योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे या क्यूआर कोड चा शेतकऱ्यांना त्यांच्याशी संबंधित योग्य योजनेचा लाभ मिळणार आहे.

**प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी खरीप हंगाम २०२५ अंतर्गत केलेल्या तयारीची माहिती बैठकीत दिली. खरीप हंगाम २०२५ साठी २ लाख ३२ हजार ३५६ मेट्रिक टन रासायनिक खतांचे अवांटन मंजूर झालेले असून मार्च २०२५ अखेर एक लाख २२ हजार ५३१ मेट्रिक टन अवांटन शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच खरीप हंगामाच्या ५ लाख ६ हजार ९२७ हेक्टर क्षेत्रासाठी १ लाख ९४ हजार ३७० मेट्रिक टन बियाण्याची आवश्यकता असून सार्वजनिक यंत्रणाकडे ११ हजार ५११ मेट्रिक टन, खाजगी स्तरावर ६८ हजार ३१९ मॅट्रिक टन तर शेतकऱ्यांकडे एक लाख १४ हजार ५४० मेट्रिक टन बियाणे उपलब्ध असल्याची माहिती श्री. भोसले यांनी दिली.**

# वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांना राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

सोलापूर येथील वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांना आज रविवार दिनांक १८ मे २५ रोजी राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते आणि उपस्थितीत देऊन सन्मानित करण्यात आले.



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे सर्जेराव जाधव सभागृहात हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. राज्यस्तरीय आद्य पत्रकार दर्पणकर आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ डिजिटल मीडिया चे सोलापूर जिल्हाध्यक्ष व सुयश मिडीयाचे ब्युरो चिफ आणि दैनिक प्रीतिसंगम चे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी महेश गायकवाड यांना आज रविवार दिनांक १८ मे २५ रोजी सोलापुर जिल्हा शिवसेनाप्रमुख मनिषदादा काळजे यांचा हस्ते आणि इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

बाळासाहेबांची शिवसेना शिंदे गट आणि सोनार हक्क परिषद स्वराज्य पोलीस मित्र आणि पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांना देण्यात आला.

या पुरस्कारवितरण कार्यक्रमास मुख्य संयोजक चंद्रकांत दादा वेदपाठक यांच्यासह अक्कलकोट शिवसेना तालुका प्रमुख संजय देशमुख, पंढरपूर येथील मुकुंद वेदपाठक, आंबेजोगाई येथील राजेश भाऊ पंडित, सोलापूर येथील सुनील पंडित, भंडारकवठे येथील संतोष दीक्षित पुणे वाघोली येथील गणेश क्षिरसागर प्रा कडबगावकर सर यांच्या सह प्रमुख मान्यवर उपस्थित होते

सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि सुयश मीडिया ग्रुपचे ब्युरो चिफ महेश गायकवाड यांनी गेल्या ४२ वर्षापासून वृत्तपत्र क्षेत्रात राहून अनेक गुंतागुंतीच्या प्रकरणाला वाचा फोडून अनेकाना आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे. रोखठोक आणि निर्भीड पत्रकार म्हणून सोलापूर जिल्ह्यात त्यांची आ‌ळख आहे. आंबेडकरी चळवळीचे अभ्यासू पत्रकार म्हणून महेश गायकवाड यांची सोलापूर जिल्ह्यात ओळख आहे. सुयश मीडिया ग्रुप च्या माध्यमातून त्यांनी तळागाळातील जनतेच्या प्रश्नावर वाचा फोडून त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या आहेत.

त्यांच्या या निर्भीड आणि रोखठोक पत्रकारितेची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत आणि अनेक नामवंतांच्या हस्ते सर्जेराव सभागृह येथे प्रदान करण्यात आला.

# पाण्याच्या टँकरची मागणी आल्यास प्रशासनाने ४८ तासाच्या आत मंजुरी द्यावी : पालकमंत्री गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सोलापूर (जिमाका) : सद्यस्थितीत जिल्ह्याच्या काही तालुक्यात पाणीटंचाईची परिस्थिती आहे. या अनुषंगाने जवळपास ६४ टँकर द्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. टंचाई कृती आराखड्यातील विविध प्रकारच्या ९ उपाय योजनाद्वारेही प्रशासन टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न करत आहे. तरीही जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून नागरिकांनी पाण्याच्या टँकरची मागणी केल्यानंतर प्रशासनाने ४८ तासाच्या आत टँकर सुरू करावा, असे निर्देश ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित टंचाई आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, राजू खरे, अभिजीत पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, उत्तम जानकर(ऑनलाईन), अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निरहाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोष कुमार देशमुख यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसीलदार सर्व गटविकास अधिकारी सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, टंचाईच्या अनुषंगाने नागरिकांनी मागणी केल्यास ४८ तासात प्रशासनाने टँकर सुरू करावा, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात पिण्याच्या तसेच वापराच्या पाण्याची टंचाई भासणार नाही या अनुषंगाने काटेकोरपणे नियोजन करावे. टंचाई उपयोजनाअंतर्गत पाण्याचे विविध स्रोत याची माहिती संबंधित यंत्रणांनी अगोदरच घेऊन ठेवावी जेणेकरून टंचाई निवारणार्थ उपाययोजना राबवताना त्या गतिमान पद्धतीने राबवणे शक्य होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी महसूल श्री देशमुख यांनी जिल्हा प्रशासनाने टंचाई कृती आराखड्या अंतर्गत राबवण्यात आलेल्या विविध ९ उपाययोजना ची माहिती दिली. मागील वर्षीचा विचार केला तर आज रोजी १७९ टँकरने पाणीपुरवठा सुरू होतात तर यावर्षी आज रोजी ६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये मंगळवेढा तालुक्यात १८ व माळशिरस तालुक्यात १६ टँकर सुरू असून बार्शी मोहोळ व पंढरपूर तालुक्यात एकही टँकर मागणी प्रस्ताव आलेले नाहीत. या टंचाई कृती आराखड्या अंतर्गत जिल्ह्यातील ६८० गावांमध्ये टंचाईच्या ११३५ उपाययोजना राबवल्या जात असून यासाठी २१ कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी लोकप्रतिनिधी यांनी जिल्ह्यातील विविध पाणी प्रकल्पातील पाण्याचे योग्य नियोजन करून आवश्यक त्या ठिकाणी टँकर बरोबरच विहीर व विंधन विहीर अधिग्रहण तसेच अन्य टंचाई निवारणार्थ अन्य उपाय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे मागणी करण्यात आली.

## कृषी योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी मोहीमेला गती देण्याचे निर्देश

## हवामानास अनुकूल पीक वाण विकसित करा

# विविध योजना व उपक्रमांसाठी महाराष्ट्राला केंद्राचे संपूर्ण सहकार्य : केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : प्रगत बियाणे, सेंद्रिय खत, हवामान अनुकूल पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान, स्मार्ट सिंचन आणि बाजारपेठेतील दुवे यांचा योग्य समन्वय शेतक-यांनी राखण्याची गरज आहे. कृषी विभागानेही देशातील अनेक भागात त्या त्या हवामानास अनुकूल पीक वाण विकसित करण्याचे निर्देश केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी विभागाला दिले. तसेच प्रत्येक शेतकऱ्यांना फार्मर आयडी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे व आयडीशिवाय कृषी योजनाचा लाभ न देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. येत्या काळात विविध योजना व उपक्रमांसाठी महाराष्ट्राला केंद्राचे संपूर्ण सहकार्य असेल, असेही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.



अमरावती रोडवरील केंद्रीय कृषी संशोधन परिषदेच्या सभागृहात आज केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री श्री. चौहान बोलत होते. यावेळी कृषि मंत्री माणिकराव कोकाटे, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, वित्त राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे प्रधान विकास रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह संबंधित विभागाचे केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील हवामान, पर्जन्यमान, कृषी क्षेत्रातील आव्हाने, खरीप हंगाम २०२५, खते आणि बि बियाण्यांची उपलब्धता, विकसित कृषी संकल्प अभियान, ग्रीस्टॅक अभियान, पुढील वर्षाचे नियोजन याविषयीची माहिती सादरीकरणाद्वारे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांनी दिली. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री श्री. चौहान म्हणाले की, हवामान बदलानुसार तसेच पर्जन्यमानुसार पिकांचे विशेषतः राज्यातील कापसाचे वाण अधिकाधिक विकसित करण्याची गरज आहे. कमी पर्जन्याच्या प्रदेशातही अधिकाधिक पीक देणारे वाण विकसित होण्याची गरज आहे. राज्याचे 'बेस्ट क्रॉपिंग मॉडेल' विकसित करण्याचे निर्देशही यावेळी मंत्री श्री. चौहान यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक

राज्यातील कृषी तसेच ग्राम विकास विभागात सुरू असलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दल केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बैठकीदरम्यान कौतुक केले. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, सँड बँक या उपक्रमांसाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले.

महाराष्ट्रातील 'सक्सेस स्टोरीज' देशभर पोहोचवा

सादरीकरणादरम्यान राज्यातील विविध भागातील शेतक-यांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी संभाजीनगर जिल्ह्यातील टापरगाव येथील शेतकरी रावसाहेब मोहिते, बीड जिल्ह्यातील रूई (धानोरा) येथील रेशमाची शेती करणारे शेतकरी एकनाथ टाळेकर, यवतमाळ जिल्ह्यातील जवळा येथील आर्चिडची शेती करणा-या शेतकरी वंदना राठोड यांच्या यशकथा देशभरात विविध माध्यमातून पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

केंद्र पुरस्कृत योजनाचा घेतला आढावा

केंद्रपुरस्कृत ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. यात प्रधानमंत्री आवास योजना, पीएम जनमन योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सेल्फ हेल्प ग्रूपअंतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती यावेळी ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी दिली. मनरेगाचा आढावाही यावेळी घेण्यात आला. यात मनरेगाच्या उद्दिष्टपूर्तीचे केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी कौतुक केले.

एक कोटी लखपती दीदींचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या १५०० रुपयांचा महिलांना आधार मिळाला आहे. महिलांनी या रकमेतून विविध व्यवसाय सुरु केले आहेत. महिलांना आवश्यक खर्च भागवण्यास देखील या पैशांची मदत होत आहे. यासोबतच महिलांना आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी लखपती दीदी ही योजना राबविण्यात येते. येत्या काळात एक कोटी लखपती दिदी बनविण्याचे राज्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बैठकीदरम्यान दिली.